# मूल एक विक्रेय वस्तू ?

माझ्या घरासमोरचा विशाल पिंपळ, दोन-तीन आठवड्यांच्या कालावधीत पूर्णपणे पर्णहीन झाला. रोजच त्याच्या पायाशी वाळलेल्या पानांचा ढीग पडत असे. ही रोजची गळती पाहणे हाच माझा छंद होऊन बसला होता. पाने झडताना पाहणे तसे क्लेशदायकच होते; पण ही निसर्गकिमया अनुभवणे हा गंमतीचा भाग होता. तरीही 'खरा गंमतीचा भाग पुढेच होता. रोजच मी हा समोरचा पिंपळ न्याहळत होतो. आता पाने जवळजवळ उरलीच नाहीत. नुसत्याच रेघारेघांच्या फांद्या. त्या फांद्यांच्या बेचक्यांत लपलेली कावळयांची घरटी पडल्यामुळे स्पष्टपणे दिसत होती. एरवी झाडापलीकडे लपलेल्या घरांची खिडक्या-दारेही या फांद्यांच्या रेघोट्यांतून लख्खपणे वृक्ष पाहणे हाच एक विलक्षण अनुभव होता. पण निसर्गाने त्याला तसे फार काळ राहून दिले नाही. गळतीच्या पोटातच उगवतीचे रूप दडले होते. अत्यंत छोटी छोटी हिरवीटंच पाने फांद्याफांद्यांवर फुटू लागली. बघता बघता फांद्यांच्या रेघांवर भराभर पानांची अक्षरे उमटू लागली, आणि पुन्हा केवळ दोन-तीन आठवड्यांच्या अवधीत पिंपळ पुन्हा नवी हिरवी पालवी अंगावर वेवून हसू लागला. आता तो पूर्वीसारखा पुन्हा जीवनरसाने सळसळू लागला. डेरेदार दिसू लागला. मी या सर्जनतेच्या अनुभवाने अचंबित झालो. निसर्गालाच दा देत पिंपळपानांसारखा डोलू लागलो.

निसर्गाच्या विविध-रूप-परिवर्तनाचा हा आनंद, मी रोजच कुणाला तरी बरोबर घेऊन, वृक्ष न्याहाळत घेत असतो. निसर्गात असे अनेक आनंदक्षण आपल्यासाठू ओथंबून आलेले असतात. जाणीवपूर्वक त्यांना सामोरे जायचे असते. मुलांना त्यांपासून दूर ठेवायचे नसते तर आवर्जून त्यात डुंबू द्यायचे असते. जी मुले लहानपणापासून अशा आनंदांना सामोरी जातात ती आपले जीवन स्वायत्ततेने जगतात; सहजासहजी कृत्रिम आनंदांना शरण जात नाहीत.

माझ्या लहानपणी असे झाडा-झुडुपांचे, नद्या-नाल्यांचे, डोंगर दऱ्यांचे आणि पावसावाऱ्याचे उदंड अनुभव, जीवनाचा एक अविभाज्य भाग म्हणून, अनेकांना मिळत होते. वाढत्या नागरीकरणामुळे निसर्ग जसा माणसांपासून दूर जाऊ लागला तसतशी माणसेही निसर्गापासून दूर जाऊ लागली. निसर्ग-माणूस यांमधील सख्य कमी होऊ लागले. दोन पिढ्यांच्या नागरीकरणाने पडलेला हा फरक आहे.

नागरीकरणाबरोबर आणखी एक गोष्ट घडत गेली. मुलांचे दैनंदिन जीवन अधिक नियमबद्ध आणि कठोर वेळापत्रकांत बांधले जाऊ लागले. शाळांचे गृहपाठाच्या निमित्ताने मुलांच्या घरच्या मोकळया वेळावर आक्रमण होऊ लागले आणि परीक्षांच्या स्पर्धात्मक स्वरूपामुळे कोचिंग क्लासेससारख्या भंगड गोष्टींनी मुलांचा मोकळा वेळ पोखरला जाऊ लागला. या साऱ्यांतून, मुख्य म्हणजे मुलांच्या सवयी बदलू लागल्या. निसर्गातील सौंदर्याचा आस्वाद मुक्तपणे घेण्याचा काळ संपून मुलांचे भावविश्व टीव्हीचे कृत्रिम कालविश्व आणि संगणकाचे बैठे ज्ञानविश्व यांनी भरून नि भारून गेले.

मोकळ्या मैदानांतील दणदण शारीरिक खेळांना मुले पारखी होऊन बसली. मैदानी खेळांतून लहान वयापासून निसर्ग अंगात मृत असे आणि मेंदूमधील पेशींवर मायेलिनचे ठार बसून मेंदूचे आयुष्यभारचे कार्य

बळकट होत असे. दिवसभर इस्त्रीचे कपडे आणि बूटमोजे यांमध्ये वावरणाऱ्या मुलांचे त्यांच्या बौद्धिक क्षमतांचे तीव्र नुकसान होते आहे हे समजण्याची क्षमताच हरवून गेली आहे.

भारतातील स्वातंत्र्योत्तर काळ हा प्रामुख्याने नागरीकरणाचा काळ होता. स्वातंत्र्योत्तर पन्नास वर्षांनंतर नवा जागतिकीकरणाचा, मुक्त भांडवलशाहीच्या तीव्र वेगाचा काळ सुरू झाला आणि मुलांच्या जीवनाला गतिमयता आणि अगतिकता या दोन्हींचा लाभ झाला.

जागतिकीकरणाच्या वाढत्या प्रक्रियेमुळे आर्थिक प्रगतीला वेग आला परंतु सामाजिक नि मानसिक क्षेत्रांत अनिश्चिततेचे नि संशयाचे वातावरण निर्माण झाले. दारिद्र्य रेषेखालील लोकांचे प्रमाण कमी झाले पण त्या रेषेखाली अजूनही असणाऱ्यांचे दारिद्र्य तीव्र झाले. वाढत्या सेवाक्षेत्राचे लाभ शहरी सुशिक्षितांना प्राप्त झाले; परंतु, ग्रामीण नि प्राथमिक क्षेत्रांतील उत्पादकांना नि कामकऱ्यांना बरे दिवस आले नाहीत. त्यामुळे विषमता वाढीस लागली. या सामाजिक परिणामांबरोबरच मानस स्तरावरील परिणाम अधिक काळजी करावेत असे आहेत.

देशामधील लोकसंख्येच्या सुमारे पस्तीस टक्के संख्या मुलांची आहे; आणि उरलेली सर्व प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे या मुलांचे पालक आहेत. आधी नागरीकरणाने-औद्योगिकीकरणाने, काही प्रमाणात आणि आता जागतिकीकरणाने - मुक्त बाजार व्यवस्थेने मुलांचे रूपांतर बाजारातील विक्रेय वस्तूमध्ये केले आहे.

मुक्त भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे एक लक्षण स्पर्धात्मकता हे मानले जाते. हे स्पर्धात्मकतेचे भूत पालकांच्या मनांवर मोठ्या प्रमाणावर आरूढ झालेले आहे आणि सदैव ग्रासलेले आहेत. भारी बाजारव्यवस्थेत आपले मूळ चांगल्या किंमतीला विकले गेले पाहिजे, अशा अपेक्षांनी मुलांना घडवण्याचा-सजवण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. ‘आंतरराष्ट्रीय’ नावांच्या आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे वेद ही या अशा मानसिकतेची निर्मिती आहे.

❖